प्रेसनोट
दिनांक ०३/१०/२०२३

**आरोपी लोकसेवक डॉ.चंद्रशेखर विश्वनाथ साखरे, वय -५२ वर्षे, जिल्हा क्रिडा अधिकारी, वर्ग - १, कोल्हापूर रा.आई निवास १५६/२, फ्लॅट नं.५, राजगृह हौसिंग सोसायटी, वृंदावन व्हिला शेजारी विश्रामबाग, सांगली यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तकारदार यांची शासनाच्या विविध विभागामध्ये साहित्य सप्लाय करण्याची खाजगी फर्म असून त्यांनी जिल्हा क्रिडा अधिकारी कोल्हापूर यांनी ऑनलाईन महाटेंडर वरती ॲल्युमिनियम कंपोझिट पॅनल वरती प्रिन्टशिट तयार करून देण्याबाबत प्रसिध्दीपत्रक दिले होते. त्याप्रमाणे तकारदार यांनी टेंडर भरले होते. सदरचे टेंडर तकारदार यांना मिळाले नंतर त्यांनी ॲल्युमिनियम कंपोझिट पॅनल वरती प्रिन्टशिट तयार करण्याचे सर्व साहित्य पुरवठा केला होता. तकारदार यांनी पुरविलेल्या साहित्याचे एकुण बिल ८,८९,२००/- रूपये झाले. सदरचे बिल मंजुर करणेसाठी आलोसे यांनी तकारदार यांचेकडे १५ टक्के दराने हे कमीशन म्हणुन १,२७,९५०/- रूपयांची मागणी केली होती.

तकारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तकार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तकारदार यांनी जिल्हा क्रिडा अधिकारी कोल्हापूर यांना साहित्य पुरवठा केलेल्या कामाचे बिल मंजुर करण्याकरीता तकारदार यांचेकडे १५टक्के दराने कमीशन म्हणुन १,२७,९५०/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती १,१०,०००/-रू. मागणी केल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर दिनांक ०३/१०/२०२३ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तकारदार यांचेकडुन **आरोपी लोकसेवक डॉ.चंद्रशेखर विश्वनाथ साखरे, वय -५२ वर्षे, जिल्हा क्रिडा अधिकारी, वर्ग - १, कोल्हापूर रा.आई निवास १५६/२, फ्लॅट नं.५, राजगृह हौसिंग सोसायटी, वृंदावन व्हिला शेजारी विश्रामबाग, सांगली** यांनी १,१०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत **आरोपी लोकसेवक डॉ.चंद्रशेखर विश्वनाथ साखरे, वय -५२ वर्षे, जिल्हा क्रिडा अधिकारी, वर्ग - १, कोल्हापूर रा.आई निवास १५६/२, प्लॉट नं.५, राजगृह हौसिंग सोसायटी, वृंदावन व्हिला शेजारी विश्रामबाग, सांगली** यांचेविरूध्द जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोलीस निरीक्षक बापु साळुके, श्रेणी पोलीस उप निरीक्षक श्री संजिव बंबरगेकर, पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर, पो.ना.श्री सचिन पाटील पो.कॉ. मयुर देसाई, पो.कॉ.संदिप पवार, पो.कॉ.रूपेश माने, चा.पो.हे.कॉ. विष्णु गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**